# सौ. वाराणसीबाई जुमदेवजी ठुब्रीकर

सेवक क्र. ०१

मु. टिमकी, नागपूर

**डॉ. मनो ठुब्रीकर हे नागपूरला कॉलेजमध्ये शिकत असतांना प्रत्यक्ष घडलेला एक भगवंताचा अनुभव.....**

महादेवराव – (आपल्या वडीलांना महानत्यागी बाबा जुमदेवजींना उद्देशून) परमेश्वर सर्वेसर्वा नाही. सर्वेसर्वा मानव आहे.

बाबा – महादेव, मानव कर्मकर्ता आहे. परमेश्वर सर्वेसर्वा आहे व तो तो पृथ्वीवर एकच आहे.

डॉ. मनो ठुब्रीकर हा आमचा एकुलता एक मुलगा. तो बी.ई. (मेटलर्जी) फर्स्ट इयरला शिकत असतानाची ही गोष्ट आहे. बाबांची शिष्यमंडळी रोज घरी येत असत. त्यांच्या बसण्याची खोली व डॉ. मनोच्या अभ्यासाची खोली एकच होती. महानत्यागी बाबा जुमदेवजींनी एका परमेश्वराची प्राप्ती केल्यामुळे त्यांची बरीच शिष्यमंडळी होती. शिष्यमंडळी भेटीस आली की बाबा त्यांना मार्गदर्शन करीत असत. ते भेटीला येणाऱ्या शिष्याकडून कसल्याही प्रकारची फी किंवा गुरुपूजा घेत नसत. बाबा, निष्काम भावनेने जनसेवा करीत असत. डॉ. मनोच्या मनात त्यांच्या मार्गदर्शनामुळे शंका निर्माण झाली की माझे वडील येणाऱ्या मानवाला मार्गदर्शन करतात त्यामुळे माझा अभ्यास बरोबर होत नाही, अभ्यासात लक्ष लागत नाही. असे त्याला वाटू लागले. तेव्हा एक दिवस डॉ. मनो बाबांना म्हणाले, बाबा आपण मानवांना परमेश्वराबाबत मार्गदर्शन करता. पण भगवान कोणी नाही. सर्वेसर्वा मानव आहे. आपण जे मार्गदर्शन करता ते सर्व व्यर्थ आहे असे मी समजतो. तेव्हा बाबा म्हणाले, म्हणाले, मी जे मार्गदर्शन करतो ते तुला पटत नाही. परंतु माझ्या मार्गदर्शनापासून तुला त्रास होणार नाही किंवा तू अभ्यासात मागे राहणार नाही अशी खात्री मी तुला देऊ शकतो. परंतु त्यांचे विचार समजून घेऊन बाबांनी मनात विचार केला की, त्याचे विचार त्याच्याजवळ, माझे कार्य माझ्याजवळ असे त्यांनी वागावयाचे ठरवले. परंतु यावर दोघांत अबोला कधी झाला नाही.

काही दिवसांनतर एक दिवस महादेव सिनेमाचा पहिला शो पाहुन आला.जेवण करुन रोजज्याप्रमाणे रात्री अकरा वाजेपर्यंत अभ्यास करुन झोपला. झोपेत त्याला एक स्वप्न दिसले. स्वप्नात त्याच्याकडे दहा लोक आले. महादेव अभ्यास करीत असताना एक मित्र भेटीला आला. त्याने त्याला आपल्या

टेबलाजवळच्या खुर्चीवर बसविले. दोघांनी चर्चा केली. चर्चा संपल्यावर तो निघुन गेला. तेव्हा आलेले लोक बसुनच होते. हे पाहून स्वप्नातच महादेव दहा लोकांवर रागावला. तुम्ही कशाला बसले आहात? जा तुम्ही आपल्या घरी. तुमचा इथे काहीच काम नाही. हे ऐकनु लोक निघुन गेले. स्वप्नात त्याची काकूपण त्याला दिसली. ती म्हणाली, महादेव तुझे डोळे लाल का दिसतात? त्याचवेळी महादेवने आपल्या काकुला विचारले, माझे बाबा कुठे आहेत ? तिने सांगितले अजुन घरी आलेले नाहीत. तेव्हा तो घरुन बाहेर निघाला आणि स्वप्नातच अंगणातल्या खाटेवर बसला. तेवढयात त्याला जाग आली. त्यावेळस त्याच्या अंगात १०४ डिग्री ताप होता. तो उठून पाणी प्याला आणि मनाशी विचार करु लागला, माझी प्रकृती एकदम चांगली होती. सिनेमा पाहुन आलो तेव्हा सर्दी किंवा अंग ठणकणे वगैरे काही नव्हते. हे एकाएकी काय झाले? असा विचार करुन पाणी पिऊन तो परत झोपला. पुन्हा स्वप्न सुरु झाले. स्वप्नात तो त्याच खाटेवर बसला होता. स्वप्नामध्ये घराशेजारच्या गल्लीतुन भजनवाले आले व देवळात जाऊन भजन करु लागले. भजन आटोपल्यावर ते आपआपल्या घरी निघुन गेले. परंतु बाबा घरी आले नाही. त्यावेळी स्वप्नात प्रकृती फारच वाईट वाटू लागली व कमजोरपणा खुप वाटू लागला. तेव्हा महादेव मोठ्या हिंमतीने हळूहळू पावलं टाकत स्वप्नातच देवळासमोर आला व देवळासमोर उभा राहून खूप रडू लागला व म्हणू लागला, बाबा हनुमानजी माझा त्रास दूर करा. तितक्यातच त्याचे बाबा आले आणि पाठीवर हात थोपटुन म्हणाले, महादेव घरी जा, तुला काहीच झाले नाही. असे बोलताक्षणीच स्वप्न संपले. त्याला जाग आली. तेव्हा त्याला वाटले की, आता अंगात ताप नाही. एकदम त्याची प्रकृती चांगली झाली. हा काय चमत्कार आहे असे त्याच्या मनात आले. नंतर मनो झोपी गेला. तो सकाळी उठला तेव्हा त्याला ताप होता. शौचाकडे जाऊन आल्यावर त्याने हातपाय व तोंड धुतले. नंतर त्याने बाबांना सांगितले की मला ताप आहे असे वाटते. तेव्हा बाबा म्हणाले, डॉ. झोडेकडे जा. त्यांना प्रकृती दाखवुन औषध घे व आजच्या दिवस कॉलेजमध्ये जाऊ नकोस. चहा घेऊन तो डॉ. झोडेकडे गेला. डॉक्टरांनी तपासून औषध दिले. घरी आला तेव्हा फारसा ताप नव्हता. परंतु थोडा ताप होताच.

त्या दिवशी महादेव कॉलेजला गेला नाही घरी होता. तेव्हा रात्री ९ वाजता विठ्ठल राऊत नावाचा त्याचा मित्र घरी आला. त्यावेळी बाबा जेवण करीत होते. विठ्ठल राऊतला महादेव म्हणाला, राऊत उद्या डॉक्टरचे सर्टीफिकेट खोटे ठरवायचे आहे. हे शब्द बाबांनी ऐकले. हे शब्द महादेवचे नव्हतेच असे त्यांना वाटले. 'बोलविता धनी वेगळाची' या म्हणीप्रमाणे हे शब्द महादेवच्या अंतःकरणातून भगवंताने काढले, असे त्यांना वाटले. त्या रात्री आनंदाने झोपी गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळी बाबा आपल्या कामावर निघून गेले. दुपारी ११ वाजता घरी येऊन जेवले त्यावेळी महादेव व त्याचा मित्र राऊत हे डॉक्टर झोडेकडुन औषध घेऊन घरी आले व एक गोळी त्याने घेतली.

गोळी घेताक्षणीच महादेवने डोळे फिरविले हे पाहून मी धावले. मुलगा कसा करतो, कसा करतो म्हणून मी रडू लागली. तेव्हा मला बाबांनी म्हटले ही वेळ रडायची नव्हे, संघर्षाची आहे. मानवी जीवन हे संघर्षमय आहे. संघर्षातूनच मानवी जीवनात जीत होते असे ते म्हणाले. नंतर मी भगवान बाबा हनुमानजीला कापराची ज्योत लावली आणि विनंती केली. भगवान तू निर्दोष आहेस व मी कर्मकर्ता दोषी आहे. माझ्या हातुन काही कर्म चुकले असेल तर त्याची मला क्षमा करा, अशी विनंती केली. परंतु महादेवला आराम पडला नाही. तेव्हा त्यांनी मला भगवंताची विनंती करण्यास सांगितले. त्यांनी सुध्दा भगवंताला कापूर लावून विनंती केली व क्षमा मागितली. तरीपण महादेवला आराम पडला नाही. नंतर बाबा महादेवला म्हणाले, तू ज्या अवस्थेत आहेस त्याच अवस्थेत भगवान बाबा हनुमानजीला अंतःकरणातूनच क्षमा माग. असे बाबांनी मार्गदर्शन केले व त्यांनी त्याप्रमाणे भगवंताला माफी मागितली. तेव्हा भगवंताचा चमत्कार घडला. तो एकदम उठून बसला आणि म्हणू लागला, मला एकदम बरे वाटते. १५ मिनीटांनी पुनः परत तशीच स्थिती झाली. म्हणून डॉ.झोडेंना आणि विठोबाजी धापोडकर वैद्य यांनी घरी नाडी परीक्षेकरिता बोलाविले. वैद्य व डॉ. झोडे आले. डॉक्टरांनी महादेवला तपासले आणि बाहेरच्या रुममध्ये येऊन त्यांनी बाबांना सांगितले की महादेवला धनुर्वाद झाला आहे. या बिमारीला चार तासांची मुदत असते. मी सर्टीफिकेट देतो. तुम्ही त्याला लवकर मेडीकल कॉलेजमध्ये ॲडमिट करा.

तेव्हा बाबांनी स्वतः जाऊन मेडीकल कॉलज, मेयो हॉस्पीटल आणि नागपूर महानगरपालिका या ठिकाणी ॲम्बुलन्सकरिता फोन केला परंतु कुठेच ॲम्बुलन्स मिळाली नाही. बाबा इतवारी पोस्ट ऑफीसजवळ रिक्षाने गेले. तेथे ऑटो रिक्षावाले उभे होते त्यांना सांगितले सिरीयस केस मेडीकल कॉलेजमध्ये पोहोचवावयाची आहे. जे काही पैसे घ्याल ते देऊ. तेव्हा एकाने ऑटो रिक्षा समोर आणला आणि त्यात बसून ते घरी आले. घरी आल्यावर सर्वांनी मिळून भगवंताला विनंती केली. भगवंता मानवी प्रयत्नांना यश देण्याचा अधिकार तुलाच आहे. असे बोलुन बाबा, मी महादेव आणि बाबांची मोठी भावजय इतके ऑटोरिक्षात बसले आणि ऑटोरिक्षा चालू झाला. रस्त्यावर हनुमानजीचे देऊळ होते. त्या देवळासमोर ऑटोरिक्षा बंद पडला. दहा मिनिटे चालू करण्यात गेले व पुन्हा चालू झाला. गोळीबार चौकाजवळ डॉ. झोडेंच्या दवाखान्यासमोर ऑटोरिक्षा पुन्हा बंद पडला. तिथे दहा मिनिटे चालू करण्यात गेले. नंतर पुनः चालू झाला आणि गांधीबाग फव्वारा चौकासमोर पुन्हा बंद पडला. तेव्हा बाबा जुमदेवजी ऑटो रिक्षावाल्यावर रागावले आणि म्हणाले ऑटोरिक्षावाले मी तुम्हाला अगोदरच सांगितले होते की, केस सिरीयस आहे. मेडीकल कॉलेजमध्ये घेऊन जायचे आहे. तर आपण का सांगितले नाही की बाबूजी माझी गाडी ठीक नाही. आपण दुसरा ऑटो घेऊन जा. ही गाडी तर जीवघेऊ गाडी आहे. तुमची अशी भावना आहे का, की कुणाचे जीव गेले तरी चालतील पण आपणास पैसा हवा. अशा गाडीला

लाथ मारुन तोडुन टाकायला पाहीजे. असे उद्‌गार बाबांनी काढताच ऑटो रिक्षा चालु झाला आणि आम्ही मेडीकल कॉलेजमध्ये पोहोचलो तेथे डॉक्टरांनी महादेवला तपासले तेव्हा त्यांना कोणताही आजार आढळला नही. त्यांनी आम्हाला सांगितले की याला बिमारी दिसत नाही. आम्ही त्या डॉक्टरला डॉ. झोडे यांनी दिलेले सर्टिफिकेट दाखविले. त्यात लिहीले होते याला धनुर्वात झाला आहे. सर्टिफिकेट वाचून ते आश्चर्यात पडले आणि धनुर्वाताच्या वार्डात फोन केला. पाच मिनीटात त्यांनी सांगितले बाहेर ॲम्बलुन्स उभी आहे. याला धनुर्वाताच्या वार्डात घेऊन जा. आम्ही तिथुन निघालो आणि ॲम्बुलन्समध्ये बसून धनुर्वाताच्या वार्डात गेलो. तेव्हा वार्ड इन्चार्ज डॉक्टरांनी बेड नंबर दिला. त्या बेडवर महादेवला झोपविले आणि तपासले. वरिष्ठ डॉक्टर आले तेव्हा साहेबांनी केवळ सिरीयस आहे असे सांगितले. बाबांनी पुनः विचारले, डॉक्टर तुमच्या शास्त्रामध्ये सिरीयस नावाची बिमारी आहे काय? डॉक्टरनी म्हटले, नाही. तेव्हा बाबा जुमदेवजींनी विचारले की, तो सिरीयस कोणता कारणांनी झाला हे जोपर्यंत सांगणार नाही तोपर्यंत मी औषध देऊ देणार नाही. तेव्हा त्या वार्डात बरेचसे सुशिक्षित लोक आपापल्या रुग्णांना भेटण्याकरिता आले होते. ते म्हणू लागले. पोराचे वडील कसे मुर्ख आहेत. डॉक्टरला औषधोपचार करण्यास बंदी करतात. हे बोलणे डॉक्टरांच्या कानी पडताच डॉक्टर बाबा जुमदेवजींना म्हणाले, तुम्ही किती मुर्ख आहात. बिमाराला औषध देण्याकरिता रोखता. तेव्हा बाबा म्हणू लागले, मी मुलाचा वडील आहे. तुम्ही मला मुर्ख म्हणालात परंतु तुमच्या म्हणण्यावरुन मी स्वतःला महामुर्ख समजतो. जर मी लहान मुर्ख राहिलो असतो, तर डोक्यावर हात ठेवुन बसलो असतो. तेव्हा तुमच्याशी बोललो नसतो. मी महादेवचा वडील आहे. डॉक्टर, माझ्याकडून तुम्ही लिहून घ्या. जर कमी जास्त झाले तर त्याला जबाबदार मी आहे असे लिहून देतो. परंतु जोपर्यंत डॉक्टर तुम्ही बिमारबद्दल सांगणार नाही. तोपर्यंत मी औषध देऊ देणार नाही. तेव्हा त्यांनी तो निरोप माझ्याकडे पाठविला की, कोणीतरी नर्स महादेवला औषध देण्याकरिता आली, तर त्यांना सांगावे की औषध देऊ नका. तुम्ही डॉक्टरसाहेबांना विचारुन या. मगच औषध द्या. डॉक्टरसाहेबांनी फोन करुन मोठ्या डॉक्टरांना बोलविले. तेव्हा मेडीकल कॉलेजचे बरेच डॉक्टर्स आले. त्यांना वार्ड इन्चार्ज डॉक्टर सांगू लागले. एक केस आली असून ती सिरीयस आहे. त्याचे वडील औषध देऊ देत नाहीत. निदान न करता औषध दिले तर मुलाचा जीव जाईल असे त्यांचे म्हणणे आहे. डॉक्टर बिमारीचे निदान सांगा तरच औषध द्या. अन्यथा औषध देऊ नका. मी मुलाचा बाप आहे. जोपर्यंत बिमारीचे निदान आपण सांगणार नाही तोपर्यंत औषध देऊ देणार नाही. असे ते सारखे सांगतात.

एवढे बोलल्यानंतर आलेल्या डॉक्टरांनी महादेवला कोणता आजार आहे याची पूर्णपणे तपासणी केली. परंतु बिमारी कोणती आहे याबाबत डॉक्टराचे एकमत

झाले नाही. डॉक्टरांनी वार्ड इन्चार्ज डॉक्टरला काही लक्षात येत नाही असे सांगितले. पण केस सिरीयस आहे एवढे सांगून आपापल्या वार्डात ते निघून गेले. एवढ्यावर बाबांनी म्हटले की, महादेवची भगवान परीक्षा घेत आहे. त्याला काही होत नाही. इतक्यात ज्या बेडवर महादेव होता तिकडून १५, २० लोक धावत आले. त्यांनी बाबांनी पाहिले व म्हणाले, तुम्ही तिथेच थांबा-पुढे पाऊल टाकू नका. त्यामधून एकास बाबांनी बोलावले व विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की महादेव कसा तरी करतो, आपली आठवण करीत आहे. बाबा महादेवच्या बेडजवळ गेले तेव्हा महादेव बाबांना सांगू लागला बाबा, मी जगू शकत नाही. तेव्हा बाबा म्हणाले, महादेव तुला काहीच झाले नाही. तेव्हा तो बाबांना म्हणाला, एवढ्यारसुध्दा मला काहीच होत नाही. तर बाबा म्हणाले, नाही, महादेव तुला काहीच होत नाही. तेव्हा तो म्हणाला, बाबा मला काय करावे लागेल? बाबांनी सांगितले की, महादेव, तू भगवान बाबा हनुमानजीला समोर ठेव व धैर्याने काम घे. सर्व काही ठीक होईल. असे बाबांनी महादेवला मार्गदर्शन केले आणि बाबा जुमदेवजी वार्ड इन्चार्ज डॉक्टरसाहेबांच्या कार्यालयासमोर आले व उभे राहिले. पण डॉक्टरला काहीच म्हटले नाही. डॉक्टर बिमारीचे निदान करु शकले नाहीत. बिमारी कोणती याचा पत्ता लागला नाही व त्यांनी औषध व इंजक्शन काहीच दिले नाही. फक्त त्यांनी केस सिरीयस आहे एवढेच माहीत होते. बाबा जुमदेवजींचा त्यांना सवाल (प्रश्न) होता. बिमारीचे निदान सांगाल तरच औषध द्या अन्यथा औषध देऊ देणार नाही व आपणावर कोणत्याच प्रकारचा आरोप घेणार नाही असे बाबांचे म्हणणे होते.

वेळ जात होती. डॉ. झोडे यांचे म्हणणे होते की धनुर्वाताची केस आहे. हिला चार तासांची मुदत आहे. चार तासांत उपचार न झाल्यास रोगी दगावतो. बाबांना माहित होते व त्यांनी घडाळ्यात वेळ पाहिली. ॲडमिट केल्यापासून साडेचार तास होऊन गेले होते. एवढ्यात काही लोक धावत बाबांकडे आले. परंतु सर्व बाबांना घाबरत होते. कारण बाबांनी भगवान बाबा हनुमानजींची प्राप्ती केलेली आहे. व ते स्वयम् आहेत. बाबांच्या शब्दात महानशक्ती आहे. या कारणांनी लोक बाबांना सांगण्याची हिम्मत करु शकले नाही. तेव्हा बाबा म्हणाले, आपण धावत आलात, तेव्हा मी सर्व समजून गेलो. तुम्ही जाऊन महादेवला सांगा की, बाबा येत आहेत म्हणून. मंडळी धावत जाऊन महादेवला सांगू लागली की, बाबा येत आहेत. त्यांच्या मागेच बाबा आले व विचारु लागले काय गोष्ट आहे महादेव? तो सांगू लागला, बाबा मी आता जिवंत राहू शकत नाही. बाबा म्हणाले, जिवंत न राहण्याचे कारण काय? मला सांगतर. तो म्हणाला. बाबा आपण पाहा माझे दोन्ही डोळे वर चढत आहेत. तेव्हा बाबांनी पाहिले व म्हणाले, महादेव तुझे दोन्ही डोळे ठिकाणावर आहेत म्हणून तुला काहीच होत नाही. तो म्हणाला आताही मला काहीच होत नाही? बाबा म्हणाले; महादेव तुला काहीच होत नाही. तेव्हा महादेव म्हणाला तर आता मला काय करावे

लागेल. बाबांनी सांगितले भगवान बाबा हनुमानजीला समोर ठेव व धैर्याने काम घे. एवढे बोलुन बाबा वार्ड इन्चार्ज डॉक्टरसाहेबांकडे गेले व म्हणू लागले, साडेचार तास होऊन गेले. बिमारीचे निदान आपण सांगू शकले नाही व औषधही दिले नाही. आता आमची केस परत करा. डॉक्टर म्हणाले, केस परत घेऊन काय करणार? त्यावर बाबा म्हणाले, आम्ही प्रायव्हेट डॉक्टराकडे नेऊन इलाज करु. डॉक्टर म्हणाले आपण किती मुर्ख आहात. बाबा म्हणाले, डॉक्टर अब बाबाको मुरख नही कहना. हजारो लोक मला बाबा म्हणतात. मी आपल्या अधिकारात आलो आणि आपण अगोदरच मुर्ख म्हणालात. त्यावेळी मी आपणास काहीच म्हटले नाही. मी स्वतःला महामूर्ख म्हटलं. आता माझी केस मला परत करा. डॉक्टरसाहेब फार रागावले व म्हणाले मी आजपर्यंत अशी व्यक्ती कधीच पाहिली नाही. तेव्हा बाबा म्हणाले, डॉक्टरसाहेब आपण बाबांना समजा, (ओळखा) नाही तर फार मोठे नुकसान होईल. तेव्हा त्यांनी रजिस्टर काढले व म्हटले, आपण यावर सही करा. पुन्हा जर केस आणली तर मी केस घेणार नाही. नंतर बाबा महादेवच्या बेडजवळ गेले. तेव्हा मी म्हटले, मुलास नुकतीच झोप लागली आहे. तेव्हा बाबा म्हणाले, चल महादेव, घरी जाऊ. त्यास बाबांचा आवाज ऐकू आला व तो उठून बोलू लागला. येथे काही उपाय झाला नही. आता माझी तब्येत बरी आहे. बाबा आपण आपल्या घरी जाऊ. तेव्हा बाबा मला म्हणाले, मुलगा आपला आहे. त्याला कपडे घालून दे.

डॉक्टरसाहेबांचे म्हणणे होते की केस सिरीयस आहे. असे बोलताच महादेव बेडवरुन उठून उभा झाला आणि म्हणू लागला मी कुठे सिरीयय आहे. मला कपडे द्या. मी स्वतः कपडे घालतो. मी त्याला कपडे दिले. महादेवने कपडे घातले. यापूर्वी काही लोकांना रिक्षा आणावयास सांगितले होते. त्यांनी रिक्षा आणला. बाबांनी म्हटले, महादेव चल, तर तो चालू लागला. महादेव कमजोर आहे असे समजून त्याला कमरेला बाबांनी हाताचा आधार दिला. तेव्हा महादेव म्हणाला, मला सोडून द्या बाबा. मी रिक्षापर्यंत स्वतः चालत जातो. तेव्हा बाबांनी त्याला सोडून दिले. आमच्यासोबत पुष्कळ लोक होते. महादेव व मी रिक्षात बसून घरी आलो. नंतर बाबासोबत जे लोक होते ते सर्व बस स्टॉपवर गेले व बसने घरी आले. घरी आल्यावर बाबांनी मला विचारले महादेव जेवला का? तेव्हा मी म्हटले महादेवने काहीच खाल्ले नाही. फक्त एक कप कॉफी पिऊन तो झोपला आहे. तेव्हा बाबा म्हणाले ठीक आहे. त्याला आराम करु दे. इतक्यात महादेवचे मामा एस.बी.बुरडे घरी आले. त्यांनी विचारपुस केली असता बाबांनी त्यांना सर्व हकीगत सांगितली. ती ऐकून त्यांना वाईट वाटले. त्यांनी आमच्याकडेच आराम केला. रात्री महादेवला कोणत्याच प्रकारचा त्रास झाला नाही. घरी येताच महादेवने भगवान बाबा हनुमानजीला कापराची ज्योत लावून म्हटले, भगवान बाबा हनुमानजी मी आपणांस भगवान नाही असे म्हटले होते. पण आता मी समजून गेलो. ''आपण भगवान आहात'' असेच समजून मी चालेन. माझ्यात जे

अज्ञान होते ते पूर्णपणे दूर झाले आहे. माझ्यात परमेश्वर आहे असेच मी समजेन व चालेन. महादेवला फार कष्ट झाले. म्हणून बाबा म्हणाले, आजचा दिवस आराम कर व उद्यापासून कॉलेजला जा.

परमेश्वराचा चमत्कार बाबांनी पाहिला आहे व मलाही तो पाहावयास मिळाला आहे. मेडीकल कॉलेजमधून केस परत करण्याकरिता रजिस्टरवर सही करण्याकरिता डॉक्टर साहेबांनी रजिस्टर दिले आणि बाबांनी त्यावर सही केली. तेव्हाच महादेवला झोप आली. त्याचवेळी भगवंताची कृपा झाली असे मला वाटले. परमेश्वर महान दयाळू आहे.

महादेव म्हणाला, बाबा आपण माझ्या जीवनात एका परमेश्वराची जागृती दिली असणि माझं जीवन धन्य केले असे मी समजतो. मी जीवनात एक परमेश्वर भगवान बाबा हनुमानजीलाच मानीन असे वचन देतो.

* * * * *